ISSN: 2393-8900 Impact Factor : 2.7825(UIF) Volume - 9 | Issue - 8 | APRIL - 2023

Historicity researcH Journal

# “भारतातील हरितक्रांतीचा इतिहास ”



**प्रा. सरला ब्रह्मदेव चव्हाण**
**विभाग - इतिहास, यशवंतराव चव्हाण महाविद्‌यालय, करमाळा.**

## प्रस्तावना:

आपला भारत हा कृषिप्रधान देश म्हणून प्रसिद्ध आहे. प्राचीन काळापासून आपल्या देशामध्ये जास्तीत जास्त लोक हे खेड्यामध्ये रहात होते. आपली खेडी हि स्वयंपूर्ण होती त्यामुळे प्राचीन, मध्ययुगीन ते इंग्रजांचे बस्तान बसेपर्यंत “जैसे थे” परिस्थिती होती. युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली, त्यामुळे युरोपमध्ये लोकांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक जीवनामध्ये बदल घडून येण्यास प्रारंभ झाला होता. त्यावेळी मात्र आपल्या देशामध्ये ब्रिटीशांची सत्ता होती. ब्रिटिशांनी त्यांच्या फायद्यासाठी का होईना आपल्या देशामध्ये शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय बदल करण्यास सुरुवात केली.

## उद्दिष्ट्ये:-

१) हरितक्रांतीचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

सन १९४७ साली इंग्रज भारताची निर्मिती करून गेले म्हणजेच आपल्या देशाची फाळणी करून भारत व पाकिस्तान असे दोन देश म्हणून विभागणी करण्यात आले. त्यावेळी दोन्ही देशांसमोर अनेक समस्या ‘आ’ वासून उभ्या होत्या. देशामध्ये सर्वच क्षेत्रामध्ये कमी जास्त प्रमाणात समस्या होत्या, त्यापैकी “अन्नधान्य” ही एक समस्या अनेक समस्यांपैकी प्रमुख होती. देशाची लोकसंख्या प्रचंड होती, त्यामानाने अन्नधान्याची उपलब्धता ही अतिशय कमी होती. सर्व लोकांना चांगल्या प्रतीचे अन्नधान्य देणे ही जबाबदारी होती परंतु त्यामानाने आपल्याकडे उत्पादन काढले जात नव्हते.

तत्कालीन लोकसंख्या ही ३६ कोटी होती आणि अन्नधान्याचे उत्पादन पन्नास दशलक्ष टणाच्या आसपास होते. त्यामुळे सर्वांना पुरविणे तेही चांगल्या पद्धतीने कठीण होते, म्हणून भारताने अमेरिकेबरोबर एक करार केला आणि त्या करारानुसार भारताला अमेरिका गहू देवू लागला आपली गरज भागू लागली, परंतु जो गहू भारताला अमेरिका देत होती तो अतिशय निकृष्ट दर्जाचा होता, शिवाय तो गहू अमेरिकेत डुकरांना खावू घालत होते म्हणजे निकृष्ट दर्जाचा तर होताच याशिवाय भारताच्या दृष्टीने ती गोष्ट अपमानास्पद होती. तत्कालीन जागतिक दर्जाचे अर्थतज्ञ पेडलॉक ब्रदर्स यांनी भारत हा या संकटापासून बाहेर पडू शकत नाही. असे म्हटले होते म्हणजेच भारताला या समस्येतून बाहेर पडणे कठीण आहे असाच त्याचा अर्थ निघतो.

सन १९६२ साली आपल्या देशाचे कृषिमंत्री एस. के . पाटील हे होते. आपल्या देशातील अन्नधान्य उत्पादन वाढविण्यापेक्षा आयात करणेच उचित आहे असे त्यांचे मत होते. तसेच आपल्या देशाचे तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सुद्धा आपण अन्नधान्य उत्पादन वाढविण्यामध्ये कमी पडतो हे मान्य केले होते. अन्नधान्य आयातीमुळे आपले परकीय चलन मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च होत होते.

व्हिएतनाम युद्धाच्या वेळी भारताने व्हिएतनामला पाठींबा दिल्यामुळे आयातीमध्ये अडचणी निर्माण झाल्या त्यावेळी इंदिरा गांधी यांनी अन्नधान्य उत्पादनामध्ये भारताला स्वयंपूर्ण करण्याचा निर्धार करून त्यांनी ती जबाबदारी कृषीमंत्र्यांवर सोपविली.

तत्कालीन कृषिमंत्री हे शेतकरी कुटुंबातले असल्यामुळे त्यांना चांगल्यापैकी शेतकऱ्यांच्या समस्या माहित होत्या. त्याच दरम्यान त्यांनी “भारताची कृषी समस्या अन्न समस्या” नावाचे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये शेतीविषयक समस्याविषयी चांगल्या प्रकारे उहापोह केलेला होता हे पुस्तकच हरितक्रांतीसाठी ब्लूप्रिंट बनले. याच्याच आधारे हरितक्रांतीची दिशा ठरवली गेली या पुस्तकामध्ये अन्नधान्य उत्पादन वाढविण्यासाठीचे सखोल असे मार्गदर्शन केलेले होते. तसेच अन्नधान्याला योग्य भाव मिळावा याचाही उल्लेख यामध्ये केलेला होता. शेतकऱ्यांनी सुद्धा फक्त शेतीवर अवलंबून न राहता जोडधंदे केले पाहिजेत असे प्रोत्साहन ही त्यासाठी दिले होते.

महाराष्ट्रामध्ये हरितक्रांतीचे जनक म्हणून वसंतराव नाईक यांची ओळख आहे. त्यांनी हरितक्रांती घडवून आणली. त्यामुळे १९७२ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता त्यावेळी त्या भीषण दुष्काळावरती महाराष्ट्राने मात केली होते याचे कारण हरितक्रांती होय.

सन १९६० च्या दशकात शेती संशोधन विकास व तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतामधील कृषी उत्पादन वाढले म्हणून हा काळ हरितक्रांती म्हणून ओळखला जातो.

हरितक्रांती या शब्दाचा इतिहास बघायचे झाले तर आपल्याला अमेरिकेचा इतिहास पाहावा लागेल म्हणजेच विल्यम गॉ ड यांनी या शब्दाचा वापर सर्वप्रथम केला. रॉकफेलर फौन्डेशन मेक्सिको मध्ये सुरु केलेल्या धान्यउत्पादन अभियानांतर्गत गहू पिकाचे उत्पादन वाढविण्याची जबाबदारी नॉर्मन बोरलॉग यांच्यावर सोपवली होती कोणत्याही सुविधांशिवाय राहून त्यांनी ती जबाबदारी पेलली याशिवाय जगासमोर एक आदर्श निर्माण करून दाखविल्या. त्यामुळेच तेरा वर्ष सातत्याने अथक परिश्रमाच्या जोरावर त्यांनी ‘मेक्सिको’ भूकबळीच्या भयानक संकटातून बाहेर काढले. त्यानंतर त्यांनी आशिया व आफ्रिका या खंडाकडे आपला मोर्चा वळविला आणि त्या खंडातील देशांना सुद्धा आपल्या बियाणांच्या मदतीने भूकबळीवर नियंत्रण मिळविता आले म्हणजेच जगामध्ये ‘भूकबळी’ या समस्येवर नियंत्रण मिळविण्यामध्ये ते यशस्वी झाले. याचीच परिणीती म्हणजे त्यांना सन १९७० सालचा नोबेल पुरस्कार देण्यात आला.

## निष्कर्ष :-

हरितक्रांती आपल्या देशात झाल्यामुळे आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला तसेच निर्यातदार सुद्धा बनला याचे सर्व श्रेय हे हरितक्रांतीला जाते. अभूतपूर्व पातळीची अन्नसुरक्षा प्रदान केली असल्यामुळे गरीब लोकांना दारिद्र्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला गेला.

हरितक्रांतीबरोबर अन्नधान्य सुरक्षितता येत असताना ती समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचणे आवश्यक असते परंतु यामध्ये आपल्या देशाला पूर्णपणे यश आलेले दिसत नाही. कारण आपल्या देशामध्ये असलेली सामाजिक विषमता हे होय. हरितक्रांतीमुळे ठराविक समाजाचीच प्रगती झाल्याचे दिसून येते. समाजातील अजूनही असे काही वंचित घटक आहेत कि, त्यांच्यापर्यंत विकासाचे म्हणा किंवा प्रगतीचे म्हणा पाऊल पोहोचलेले नाही. ते पोहोचणे आवश्यक आहे.

हरितक्रांतीमुळे अन्नधान्य उत्पादन वाढले असले तरी काही दुष्परीणामांनाही सामोरे जावे लागत आहे. अति रासायनिक खतांचा वापर केल्यामुळे जमिनीची नापिकता वाढली आहे. पाण्याचा अतिवापरही केला जात आहे. यावर उपाय म्हणजे सेंद्रिय खताचा वापर करणे रासायनिक खतांचा कमीतकमी वापर करणे तसेच पाणी वापराचे व्यवस्थित व्यवस्थापन करणे हे पर्याय नक्कीच उपयुक्त ठरतील.

शेती उत्पादन वाढत असल्याचे आकडे जरी आपल्याला दिसत असले तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या होताना दिसत आहेत. यासाठी राज्यकर्त्यांनी विचार करून त्यादृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे.

हरितक्रांतीच्या मर्यादा यांचासुद्धा विचार करावा लागतो. हरितक्रांती ही १९६० च्या दशकातील भारतातील एक महत्वाची घडामोड असली तरी ज्वारी, डाळी, कापुस, हरभरा, तेलबिया अशा अनेक पिकांच्याबाबत उत्पादन वाढ घडून आली नाही. ते होणे गरजेचे आहे.

हरितक्रांतीचा परीघ राष्ट्रीय पातळीवर आकाराला न येत तो काही राज्यांपुरताच मर्यादित राहिला. त्याचे उदाहरणच द्यायचे झाले तर गव्हाच्या बाबतीत पंजाब व हरियाना आणि ऊस व बाजरी या पिकांच्या बाबतीत महाराष्ट्र अशी ही क्रांती मर्यादित राहिली. तसेच भारताच्या ज्या भागात कोरडवाहू शेती केली जाते तिथे हरितक्रांतीचा काहीही लाभ होऊ शकलेला नाही. त्याचप्रमाणे ज्यांच्याकडे जमीन जास्त आहे त्यांनाच या हरितक्रांतीचा सर्वाधिक फायदा झालेला आहे. याचा सुद्धा विचार करणे आवश्यक आहे.

## संदर्भसूची :-


१) असा घडला भारत (१९४७-२०१२) संपादक - सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपानेकर संशोधन-संकलन युनिक फिचर्स, रोहन प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती: १९ एप्रिल, २०१३

२) द्वितीय हरितक्रांती कि ओर राष्ट्र के बढते कदम - बी.पी. भट्ट सतीश सिरीयल पब्लिशिंग हाउस, दिल्ली - ११००३३

३) हरितक्रांती माहिती मराठी - https://www.marathisocial.com/harit-kranti-information-in

४) स्वातन्त्रौत्तर भारताची यशोगाथा - https://socialindia.in/home/view-article16

५) हरितक्रांतीमुळे शेतीवर झालेले प्रतिकूल परिणाम कसे स्पष्ट कराल -उत्तर https://www.uttar.co/question/62a588fe089228a125e5e6e0

६) https://www.shaalaa.com/questionbank-solutions/haritkranti-mhanje-kaay-bhartatilgaribi -aani-vikas-223383

७) https://www.drishtiias.com/hindi/paper3/green-revolution

८) https://mr.m.wikipedia.org/wiki/%EO

९) https://marathishalalord/.com/green-revolution-in-india-in-marathi/